विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगांवकर उच्च माध्यमिक विद्यालय

मडगांव गोवा

प्रथम सत्र परीक्षा - ऑक्टोबर २०२३

इयत्ता : अकरावी विषय : मराठी (व्दितीय भाषा) वेळ : ३ तास

दिनांक : २१।१०।२०२३ गुण : ८०

---

सूचना : १. शुध्दलेखनाचे नवीन नियम पाळावेत.

२. उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

---

## विभाग १ - व्याकरण

खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा.

प्रश्न. 1. लहान 01

प्रश्न. 2. थोर 01

प्रश्न 3. स्वतंत्र 01

खालील शब्दांची विशेषणे लिहा.

प्रश्न. 4. विज्ञान 01

प्रश्न. 5. स्वभाव 01

प्रश्न. 6 अनुभव 01

खालील शब्दांचे विरूध्दार्थी शब्द लिहा.

प्रश्न. 7. न्याय 01

प्रश्न . 8. जवळ 01

प्रश्न. 9. पाप 01

खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा.

प्रश्न. 10. शेजारी 01

प्रश्न. 11. देवी 01

प्रश्न. 12. पक्षी 01

खालील शब्दांचे वचन बदलून लिहा.

प्रश्न. 13. डोळे 01

प्रश्न. 14. वृक्ष 01

प्रश्न. 15. सावली 01

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा.

प्रश्न. 16. त्याच्या हातातील दप्तर खाली पडले व त्याचा गाल पेटल्याप्रमाणे जळू लागला. 04

## विभाग २- गद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.

प्रश्न. 17. विनोबांच्या वडिलांचे बहुतेक वागणे कसे होते ? 01

प्रश्न. 18 किराणा दुकानदार दामलेची किती रुपयांची बाकी होती ? 01

प्रश्न. 19.ज्ञानेश्वरीच्या पसायदानातून ज्ञानदेवांनी कोणते चित्र रेखाटले आहे ? 01

खाली दिलेली वाक्ये योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.

प्रश्न.20. शाळा सुटल्यावर माधवाला कट्टयावर बसून पोहे खायला मिळत नसत कारण.... 01

अ. त्याला अभ्यास करावा लागयचा.

आ. त्याला दामलेच्या किराणा दुकानावर जावं लागायचं..

इ. त्याला बाटली घेऊन औषध आणायला जावं लागायचं.

प्रश्न. 21. प्रकाशकाच्या घरी कथानायकआपला ज्ञानयज्ञ.......... 01

अ. कोपऱ्यात बसून चालू ठेवी.

आ. शेल्फावर बसून चालू ठेवी.

इ. दिवानखान्यात बसून चालू ठेवी.

प्रश्न. 22. ज्ञानेश्वरांना ईश्वरनिष्ठांचे नेतृत्व करणारे .................. 01

अ. खल दुष्ट प्रवृत्तींचा अंधःकार असणारे हवेत.

आ. बोलणाऱ्या अमृताच्या सागरासारखे हवेत.

इ. सत्कर्माच्या आचरणात प्रेम नसणारे हवेत.

खालील वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.

प्रश्न. 23. " पैसे कोण तुझा बाप देणार की काय? 05

किंवा

त्या प्रत्येक फुला फळाच्या रूपानं आपली स्मृती जिवंत राहील !

खालील प्रश्नाचे उत्तर ७ ते ८ ओळीत लिहा.

प्रश्न. 24. वडिलांनी मारण्याविषयी विनोबांनी कोणते विचार व्यक्त केले आहेत ?

किंवा

लठ्ठ माणूस नदीत बुडून मेला तर बरे होईल, असा दुष्ट विचार कथानायकाच्या मनात का आला ? 05

## विभाग ३ - पद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.

प्रश्न.25. वैष्णवानी खेळ कुठे मांडलेला आहे ? 01

प्रश्न. 26. कवी दा.अ. कारे यांनी गोमन्तदेवीकडे शेवटी कोणती इच्छा व्यक्त केली आहे ? 01

प्रश्न. 27. घराभोवती काय हवं असे कवी गोखले म्हणतात ? 01

खाली दिलेली कवितेच्या ओळी योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.

प्रश्न. 28. ______म्हणे सोपी केली पायवाट । उतरावया भवसागर रे ॥ 01

प्रश्न. 29. तारांमध्ये बारा रासी, सप्तवारामाजि _______ 01

प्रश्न. 30. प्रेमभरे हृदय भरे, _______ तव पदां ! 01

( रवीससी, एका, नमन, तुका )

खालील कवितेतील ओळीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.

प्रश्न. 31. वर्णाभिमान विसरली याति । एकाएका लोटांगणी जाती ॥ 05

निर्मळ चित्तें जाती नवनीतें । पाषाणा पाझर सुटती रे ॥

किंवा

परी कोरडी होती घागर, केवळ होती नाणी आत

खालील प्रश्नाचे उत्तर ७ ते ८ ओळीत लिहा.

प्रश्न. 32. कवी फादर स्टिफन्स यांनी मराठी भाषेची महती कशी गायिली आहे? 05

किंवा

घराला घरपण कशामुळे लाभते, असे कवी चंद्रशेखर गोखलेनां वाटते ?

विभाग ४ - लेखन

खाली दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य पर्याय निवडून लिहा.

प्रश्न. 33. खोल बिंबणे ______________ 01

अ. स्वतःचे दोष स्वतःच पाहणे

आ. आठवणीत राहणे

इ. कामाचा हिशोब घेणे

ई. विचारमग्न होणे

प्रश्न. 34. भूक मरणे ______________ 01

अ. पोटात कावळे रडणे

आ. खूप भूक लागणे

इ. भूक संपणे

ई. काही खावेसे न वाटणे

प्रश्न. 35. हायसे वाटणे ______________ 01

अ. सुटका झाल्यासारखे वाटणे

आ. आनंद मिळवणे

इ. गुदमरुन जाणे

ई. सरळ वागणे

प्रश्न. 36. गालगोट लावणे ________________ 01

अ. वाईट वाटणे

आ. दिमाख वाटणे

इ. डाग लागणे

ई. आकर्षित करणे

खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

नियमांचे पालन केले तर जशी एक शिस्त येते, तसेच व्यवस्थितपणा हा देखील एक महत्वाचा गुण आहे. तो गुण लहानपणापासूनच अंगी बाळगायला शिका. हा गुण आत्मसाद केलात तर तुमचे व्यक्तीमत्व प्रभावी ठरेल.रोजच्या व्यवहारात तर व्यवस्थितपणा अतिशय उपयोगी पडतो. ऑफिसमध्ये जशी व्यवस्थितपणाची गरज असते,तशी वैयक्तिक जीवनातही असते. हा गुण नसेल तर कामात गोंधळ होईल.कामात गोंधळ झाला की डोक्यात व्हायला वेळ नाही लागत. आताच्या तुमच्या शालेय जीवनात तुम्हीच करण्याजोगी काही कामे असतात.उदा.वह्या,पुस्तके जागच्या जागी ठेवणे,दप्तर वेळेवर भरणे,डबा धुवायला टाकणे इ. कामात जर व्यवस्थितपणा तुम्ही आणलात तर कधीच तुमचा गोंधळ होणार नाही.या कामात आई बाबांवर विसंबून राहू नका. एकदा जर परावलंबनाची सवय लागली की तुम्ही स्वावलंबी बनणार नाहीत. कामाचा उरक,नीटनेटके-पणा ,व्यवस्थितपणा ही शिस्तीची अंगे आहेत.हे शिस्तीचे कौशल्य जर तुम्ही आत्मसाद केलेत तर आयुष्यभर ते फलदायी ठरेल.

(जीवनमूल्ये)

सौ. राजकुँवर सोनवणे

प्रश्न. 37. लहानपणापासून कोणता गुण अंगी बाळगणे गरजेचे आहे ? 01

प्रश्न. 38. आपला गोंधळ केव्हा होतो ? 02

प्रश्न. 39. शालेय जीवनात व्यवस्थितपणा कसा आणाल ? 02

प्रश्न. 40. ' सारांश उच्च माध्यमिक विद्यालय ' सांगें येथे स्वातंत्र दिनाचा सोहळा आयोजित केला आहे. या कार्य क्रमाची कार्यक्रमपत्रिका तयार करा. 05

प्रश्न.41. 'स्वच्छतेचे महत्व' या विषयावर दोन मित्र/ मैत्रिणीमधील संवाद सुमारे १० ते १२ ओळीत लिहा. 05

प्रश्न. 42. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे पंचवीस ओळींचा निबंध लिहा. 10

मी शेतकरी झालो तर...

किंवा

आजची स्त्री

किंवा

मी केलेली अविस्मरणीय सहल

किंवा

एका पुस्तकाचे आत्मवृत्त

किंवा

माझा आवडता खेळाडू